'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी साहित्य संशोधन विशेषांक Vol. 2 Issue. 3 July-Sept.- 2015

# शांताबाई शेळके यांच्या ललितगद्य लेखनातील 'स्त्री'विषयक जाणीवांचा अभ्यास

प्रा. डॉ. रंजना मधुकर कदम
मराठी विभाग प्रमुख,
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,
अकोले, ता. अकोले जि. अहमदनगर

*स्त्रीजन्म म्हणजे त्याग, सोशिकता, कष्ट, नम्रता, मर्यादा, परोपकार अशा अनेक समजुतींनी तिचे जीवन बांधून टाकलेले आहे. यापेक्षा वेगळे वागण्याचा प्रयत्न करताना तिला संघर्ष करावा लागतो, खंबीर व्हावे लागते. आपल्या देशात पुरुष प्रधान संस्कृती असल्याने पुरुषांच्या इच्छेप्रमाणे स्त्रियांनी वागणे याला आदर्श स्त्री म्हटले जाते. घरदार, नवरा, मुले हेच तिचे विश्व. यांच्या सुखासाठीच तिने आपले जीवन समर्पित करायचे. स्त्री म्हटली की, प्रत्येक गोष्टीची मर्यादा असलीच पाहिजे. तिच्या वागण्यावर, बोलण्यावर, हसण्यावर मर्यादा असते. जी स्त्री या गोष्टींकडे लक्ष देत नाही तिला वरचढ समजून तिची अवहेलना केली जाते. परंतु त्याचबरोबर अनेक स्त्रिया स्वत: मध्ये बदल घडवून आणायला तयार नसतात. परंपरेला कवटाळून बसतात. प्रस्तुत शोधनिबंधातून शांता शेळके यांच्या ललितगद्य लेखनात स्त्री म्हणून कोणता वेगळेपणा जाणवतो, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

स्त्रियांची जीवनाविषयीची उदासीनता, आळशीपणा उत्साहाचा अभाव इ. वृत्तींवरही शांता बाईंनी टीका केली आहे. स्त्री ही पुरुषांपेक्षा हळवी, संवेदनशील, प्रेमळ, वत्सल असते. ती आपल्या भावना लगेच बोलून दाखवते. अर्थात हे विशेष पुरुषांमध्येही असतात पण स्त्रियांमध्ये ते काही प्रमाणात का होईना पण जास्त जाणवतात. स्त्रियांमध्ये शारीरिक क्षमता कमी असते. त्यामुळे गरीब, निराधार, आश्रित स्त्रियांवर अन्याय होतो. स्त्रियांना स्वतंत्र निर्णय घेण्याचा, आपल्या मर्जीनुसार वागण्याचा अधिकारी नाकारला जातो. तिच्या कष्टांना, भावनांना किंमत दिली जात नाही. तसेच ती सासरी आल्यावर बऱ्याचदा तिला समजून घेतले जात नाही. तिच्या भावनांची कदर केली जात नाही. शांता शेळके यांनी आपल्या लेखनातून स्त्री जीवनाचा वेध घेतला आहे. त्यांनी आपल्या लेखनातून अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. या परिस्थितीत काही प्रमाणात फरक पडला असला तरी, म्हणावा तसा फरक दिसून येत नाही. यासाठी मोठ्या प्रमाणात मानसिक परिवर्तन होणे आवश्यक आहे. शांता शेळके यांनी आपल्या ललितगद्य लेखनातून स्त्रियांचे अनुभवविश्व व्यक्त केले आहे. त्यांच्या काळातील स्त्री जीवन कसे होते याचा वेध या लेखातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**घरकामाची आवड -**

अनेक स्त्रियांची वृत्ती कलासक्त असते. त्या अनेक कला आवडीने आत्मसात करतात. रसिक, उत्साही स्त्रियांना नवनवीन गोष्टी शिकायला मनापासून आवडते. शांबाईच्या आईने हौशी गृहिणींप्रमाणे अनेक कला आत्मसात केल्या होत्या. त्याविषयी शांताबाई लिहितात. 'अनेक कला वहिनीने जोपासल्या होत्या. ती रांगोळया अतिशय सुरेख काढत असे. पोतीच्या मण्यांचे कासव तयार करणे, दारावरची काचनळ्यांचे सुबक तोरणे बनवणे, लोकरीचे आणि आसनाच्या सुईचे विणकाम करणे. हे त्या काळातल्या अनेक स्त्रिया करत असत. हे सारे वहिनीला येत होते आणि ते ती अतिशय हौसेने करायची. अनेक मध्यवर्गीय स्त्रियांची कलासक्तवृत्ती विविध गोष्टींतून कशी प्रकट होते, ते शांताबाईनी नेमकेपणाने दाखवून दिले आहे. यातून स्त्रियांच्या रसिक सौदर्यपूर्ण हौशी मनाचे दर्शन घडते.

**वय लपवण्याची वृत्ती -**

बऱ्याच स्त्रिया वय वाढले तरी स्वत: ला तरुण समजतात. आपले वय लपवण्यासाठी त्या सतत प्रयत्नशील असतात. वाढत्या वयानुसार शरीरात होणारे परिवर्तन स्वीकारायला त्या तयार होत नाहीत. आपले वय लपवण्यासाठी त्या कशी

केविलवाणी धडपड करतात, या विषयी शांताबाई लिहितात. ßतारुण्य इतरांच्या मनावर अट्टाहासाने ठसवण्यासाठी त्या केसांना रंग लावतात, चेहरा परोपरीच्या प्रसाधनांनी, अत्याधुनिक पोशाख करतात. वागण्याबोलण्यात जादा उत्साह प्रकट करतात. त्याप्रमाणे आपल्या नातवंडांना आजी या नावाने स्वत:ला हाक मारण्याची सक्त मनाई करतात. यावरुन अनेक स्त्रिया वय लपवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. आपण कायम तरुण दिसावे अशी त्यांची स्त्रीसुलभ भावना असते.

**मुलांच्या लाडाचे दुष्परिणाम -**

काही आया मुलींची जास्तच काळजी घेतात. त्यामुळे त्या मुलींना दुसऱ्यावर विसंबून राहण्याची सवय लागते. त्या कोणतीच गोष्ट स्वतंत्रपणे करत नाहीत. त्यामुळे त्यांचे जिवन कसे परावलंबी बनते. ते दाखवून देताना शांताबाई लिहितात. ' आईने अतोनात जपलेल्या काही मुली मोठेपणे नवऱ्यावर वाजवीपेक्षा अधिक अवलंबून राहतात. अशा मुली कित्येकदा चुकीने प्रेम करतात. प्रेमापोटी अवास्तव अपेक्षा बाळगतात. परिणामी त्या दु:खी होतात. एकटेपणाचे त्यांना इतके भय वाटते की, कुणाचा तरी पदर धरल्याखेरीज एक पाऊल त्यांना पुढे टाकता येत नाही. म्हणजेच मुलीची प्रमाणापेक्षा जास्त काळजी घेतल्याने त्यांचे जीवन खुरटे बनते. त्यांची मानसिक वाढ होत नाही. आईच्या मायेखाली त्यांची वाढ खुंटते.

**वात्सल्य हरवलेल्या स्त्रिया -**

अनेक स्त्रिया स्वत:ला मूल न झाल्याचे कठोर बनतात. त्यांचे वात्सल्य हरवून जाते. इंग्लंडची उत्कृष्ट अभिनेत्री जोन क्रॉफर्ड यांच्या बाबतीतही असाच अनुभव आहे. त्याबद्दल शांताबाई लिहितात. 'जोनच्या वात्सल्याची एकूण तऱ्हाच विचित्र होती. मुलांना भरपूर कपडे, पण ते त्यांनी मॉमीच्या मर्जीनुसारच वापरायचे. घरात उत्कृष्ट कपाटे आणि त्यांत अनेक सुंदर वस्तू. पण त्यातल्या कशालाही मुलांनी हात लावायचा नाही. धूळ, कचरा, घाण ह्यांची तर जोन क्रॉफर्डला ॲलर्जी होती. जमिनीवरच्या मूल्यवान पार्शियन गालिच्यावर किंवा भारी सोफासेटवर इतकीशी जरी धूळ पडली किंवा मुलांनी कागदाचा एखादा कपडा टाकला तर रागाने जानचे देहभान हरपे.' ज्या स्त्रियांना संसारिक सुख लाभत नाही. मुलांचे सुख लाभत नाही, अशा स्त्रिया सततच्या तणावामुळे विकृत बनतात. मग त्यांच्या सहवासात येणाऱ्या सावत्र किंवा दत्तक मुलांना सतत दडपणाखाली, केविलवाणे जीवन जगावे लागते.

RESEARCH JOURNEY

**निरुत्साही वृत्ती -**

अनेक बायका निरुत्साही, आळशी असतात. जगावे कसे हेच त्यांना कळालेले नसते. त्यामुळे त्यांना प्रत्येक गोष्ट कटकटीची वाटते. त्या स्वत:ही समाधानही, आनंदी जीवन जगत नाहीत. आणि इतरांनाही त्यांचा सहवास नकोसा वाटतो. शांताबाई लिहितात, 'खरे तर तिला जीवनात स्वारस्य न वाटण्याचे, जगण्याचा कंटाळा येण्याचे कारण नाही. तरीही ती सारख्या तक्रारी करत होती. अनेक खऱ्या खोट्या दु:खाची, निराशेची गाथा उलगडत होती आणि पुन्हा पुन्हा घोळवून मला सांगत होती, खरच ग जगण्यात काही अर्थ नाही. जीवनात स्वास्थ कस ते वाटतच नाही. म्हणजेच चांगल्या धडधाकट, निरोगी, कार्यक्षम माणसाला जीवनाचा कंटाळा यावा ही फार वाईट गोष्ट आहे.

**खेड्यातील स्त्रियांचे जीवन -**

शांताबाई आपल्या आजोळच्या बायकांच्या जीवनाविषयी लिहितात, ' घरातल्या बायकांच्या जीवनक्रम ठरलेला होता. सकाळ - संध्याकाळ स्वयंपाक करणे, पोरेबाळे सांभाळणे, दुकानावर राबणाऱ्या गड्यांसाठी भाकरी थापणे ही घरगुती कामे असत. पण त्याबरोबर सूत उकलणे, कांड्या भरणे, तळणे, खळ शिजवून ती लुगड्याच्या धाग्यांना माखणे ही व्यावसायिक कामेही बायका करत. माझ्या आजोळच्या घरातल्या बायकांचे आयुष्य तसे सुखासीन होते. एकत्र कुटूंबात वाट्याला येणारे

कष्ट त्या उपसत. पण तशा त्या चैनीत आणि लाडाकोडात वावरतांना दिसत.' म्हणजेच खेड्यातील स्त्रियांना एकत्र कुटूंबात कष्ट करावे लागतात. पण त्याचबरोबर एकमेकींच्या सहवासात जीवन सुसह्या होत असे.

**स्त्रियांची खंबीर वृत्ती -**

अनेक स्त्रिया आपल्या जीवनातील दु:खांना खंबीरपणे सामोरी जातात. कारण आपल्या दु:खाबद्दल कोणी सहानुभूती दाखवावी आपली कीव करावी हे त्यांना आवडत नाही. शांताबाईची एका तरुण प्राध्यापिकेशी ओळख झाली होती. त्या प्राध्यापिकेने आपल्या नुकत्याच जन्मलेल्या मुलीच्या मृत्यूचे दु:ख न खचता धीटपणे पचवले होते. त्याविषयी शांताबाई लिहितात. 'दुसऱ्याच क्षणी तिने स्वत:ला सावरल तिचा चेहरा स्थिर झाला. नव्हे क्षणभर प्रकटलेल्या मूळच्या चेहऱ्यावर तो सुंदर, रेखीव प्रसाधित चेहरा मुखवट्यासारखा पुन्हा येऊन बसला. तिच्या डोळ्यांत पाणी आले नाही. निग्रहाने तिने ते येऊ दिले नाही. कापणारे ओठ पुन्हा शांत झाले.' म्हणजेच काही स्त्रिया दु:खाने खचून जात नाहीत. तर मोठ्याा हिंमतीने त्या स्वत:ला सावरतात व आपले जीवन पुन्हा नव्याने जगायला सुरुवात करतात किंवा पूर्वीप्रमाणे आपले सर्व व्यवहार सुरळीत पार पाडतात.

**मागास उदाशीन वृत्ती -**

आजच्या बहुसंख्य स्त्रियांचे बाह्यदर्शन सुंदर आहे. पण खोलात जाऊन पाहिले तर स्त्रीची मानसिक वृत्ती फारशी बदललेली नाही. किंवा पूर्वीच्या स्त्रियांमध्ये जीवनाचा बरावाईट अनुभव घेऊन जो एक शांत सोशिकपणा येई त्याचाही मागमूस नाही. या विषयी शांताबाई लिहितात, 'ती रोजची वृत्तपत्रे वाचत नाही. साहित्यातील नव्या प्रवाहाबद्दल तिला आस्था नाही. कॉम्प्युटरसारखे अत्याधुनिक साधन किती दूरगामी परिणाम करू लागले आहे हे तिला माहित नाही. दूरदर्शन बघतातना उथळ, रंजक फिल्मी कार्यक्रमांपलीकडे तिची मजल जात नाही.' म्हणजेच अनेक स्त्रियांची नवीन ज्ञान मिळण्यासंबधी उदाशिनता शांताबाईंनी नेमकेपणाने दाखवून दिली आहे.

**नातेसंबध -**

एकत्र कुटूंबातील हेवेदावे, अन्याय, मत्सर दाखवून देताना शांताबाई लिहितात, ' सासवा सुनांचा छळ करतात. एखादे खाष्ट शंकर मामंजी घरातल्या दुबळ्या आणि परावलंबी जीवांना साळो की पळो करुन सोडतात. जावा जावा एकमेकींशी कडाडून भांडतात. एकमेकींचा पराकाष्टेचा दुस्वास करतात. जिचा पती कमावता असेल ती घरातल्या इतर बायकांसमोर तोरा मिरवते. आढ्यातेने वागते बोलते. देण्याघेण्यातले कमीजास्त काटेकोरपणाने जपले जाते. अकाली पतिनिधनामुळे वैधव्य आलेल्या, स्वत:जवळ अर्थार्जनाची कुवत नसल्यामुळे परावलंबी झालेल्या असहाय्य तरुण स्त्रियांना नाना प्रकारच्या अपमानांना तोंड द्यावे लागते आणि प्रसंगी दुष्टांच्या पाशवीवृत्तीला देखील त्या बळी पडतात.' म्हणजेच एकत्र कुटूंबात स्त्रियांची अनेक अंगांनी कुचंबना होते. स्त्रियाच स्त्रियांना समजून घेत नाहीत. स्वत:चा अधिकार, वर्चस्व यांमुळे त्या दुसरीवर अनेक प्रकारचा अन्याय करत असतात. म्हणजेच एकत्र कुटूंबात समंजसपणा नसेल तर स्त्रियांमधले हेवेदावे, मत्सर, तुच्छता कशी पराकोटीला जाते. तसेच घरातील पुरुष आसहाय्य, निराधार महिलेवर कसा अन्याय करतात याचेही दर्शन घडते.

**सोशिक वृत्ती :**

शांताबाईच्या आई समजंस, सोशिक होत्या. परिस्थितीचा समजूतदारपणे स्वीकार करणे, खंबीरपणे उभे राहणे, हे त्यांचे स्वभाव विशेष होते. शांताबाई अवघ्या नऊ वर्षाच्या असताना त्यांचे वडील वारले. त्यामुळे शांताबाईच्या आईला दिराच्या घरी धाकट्याा जावेच्या हाताखाली दिवस काढावे लागले. त्या दिवसात आईने सर्व प्रकारची कामे केली. याविषयी शांताबाई लिहितात, ' दळणाचा डबा भरुन ती गिरणीत तासणतास उभी राहून दळण दळूण आणायची. कोळशाची खर विकत आणून ती शेणात कालवून बंबात घालण्यासाठी खरीचे गोळे वळायची. मणामणाच्या डाळी भरडायची. वर्षाचे पापड, लोणची, सांडगे, शवेया

करायची. घरातली तांब्या पितळाची अवजड भांडी रविवारी चिंचमीठ लाऊन घासून लख्ख करायची.' जावेच्या घरी आपण व आपली मुले यांनी ओझे होऊन राहू नये म्हणून पडतील ते कष्ट उपसायला शांताबाईची आई तयार असायची. ज्या स्त्रियांना वैधव्य प्राप्त होते. त्यांची सर्वच बाजूंनी कशी कुचंबना होते. त्यांना दु:ख, कष्ट, वेदना यातच जीवन जगावे लागते. त्यांच्या भावनांचा विचार केला जात नाही. अशा प्रकारे शांताबाईच्या लेखनात स्त्री म्हणून जो वेगळेपणा जाणवतो. त्याचा थोडक्यात आढावा घेता येतो.

**संवेदनशीलता - भावनाशीलता**

आपल्या देशात पुरुषप्रधान संस्कृती असल्याने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. प्रत्येक गोष्टीत तिला कमी समजले जाते. तिच्याकडून अनेक अपेक्षा केल्या जातात. समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा .ष्टिकोन कसा असतो याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त करताना शांताबाई लिहितात. ' एक जिवंत, हाडामासाची, वासनाविकारांनी युक्त असलेली आणि पुरुषाप्रमाणेच आपला आत्मगौरव जपू बघणारी जाणीवसंपन्न व्यक्ती या नात्याने स्त्रीकडे सहसा बघितले गेलेले दिसत नाही.' म्हणजेच स्त्रीकडे माणूस म्हणून बघितले जात नाही. तर एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले जाते. तिच्या भावनांना महत्त्व दिले जात नाही. त्यामुळे तिची आयुष्यभर घुसमट, कोंडी होते हेच शांताबाईची दाखवून दिले आहे.

जुने फोटो पाहताना शांताबाईच्या मनात ज्या भावना येतात, त्या टिपताना शांताबाई लिहितात. 'त्याकडे बघताना मन भरुन येते. काळजात कालवाकालव होते. आज त्या फोटोतली एकही व्यक्ती हयात नाही. पण त्यांच्याशी आपले रक्तसंबध जुळलेले आहेत, आपल्या व्यक्तिमतत्वाचा उगम त्यांच्यातून झाला आहे. आणि कितीही वर्षे लोटली, परिस्थितीत, शिक्षणात कितीही फरक पडला तरी आपली नाळ त्यांच्याशीच जुळलेली आहे. अशी काही एक विलक्षण जाणीव तो फोटो बघताना मला येते.' म्हणजेच जुने फोटो पाहून शांताबाईचे संवेदनशीलमन कसे हळवे होते. जुन्या आठवणींनी कसे भरुन येते. याचे अचून वर्णन केले आहे.

विवाहोत्तर जीवनाविषयीचे विचार प्रकट करताना शांताबाई म्हणतात. ' विवाहोत्तर प्रणयाचा आनंद हरपतो. पण तो कायमचा नष्ट होत नाही. तो एक वेगळे रुपय धारण करुन येतो इतकेच. तो आनंद जरा उदास, खिन्न, अधिक शहाणा व समंजस असा होऊन येतो. पुष्कळ जोडप्यांना त्याची ओळख पटत नाही. पण ज्यांना ती पटते ते भाग्यवान. त्याचा संसार सुरक्षित राहतो. ती पतिपत्नी मनाने अधिक जवळ येतात. पण जे हरवले ते हरवलेच ते तसे पुन्हा कधीच मिळत नाही. अशा वेळी वास्तवाचा निमूटपणे स्वीकार करायचा असतो. त्यालाच सामोरे जायचे असते.' म्हणजेच प्रत्येक जोडप्याला विवाहोत्तर काळात सुरुवातीला अमाप सुख लाभते. ते सुख आयुष्यात एकदाच भेटते. वैवाहिक जीवन जसजसे प्रौढ, परिणत होत जाते, तसतसे त्यात वेगळे भावबंध निर्माण होतात. त्यात प्रारंभीचे ते सुंदर सुख पुन्हा गवसत नाही.

माणसाची शोकांतिका नेमकी कोणती आहे. ती सांगताना शांताबाई लिहितात, 'माझं कुणी ऐकायला तयार नाही. हीच आपलीही साऱ्यांची तक्रार नसते का? आपण कुणीच एकमेकांचे ऐकून घेत नाही. आपण कुणीच एकमेकांना खऱ्या अर्थाने समजूनही घेत नाही. तरीही माणसे एकमेकांना सारखे काहीतरी सांगत असतात. आपल्यावर होणारे खरे व काल्पनिक अन्याय, आपल्याला भोगावी लागणारी खरी वा काल्पनिक दु:खे, आपल्या भेडसावणाऱ्या समस्या आणि आपले अगदी क्षुद्र केविलवाणे हास्यास्पद आनंद सारे काही इतरांना ऐकवल्याखेरीज आपल्याला चैन पडत नाही.' प्रत्येक माणूस स्वत:ला, स्वत:च्या सुख दु:खांना, भावनांना महत्व देतो. दुसऱ्याच्या भावनांचा तो बारकाईने विचार करत नाही. दुसऱ्याला तो समजून घेत नाही. समंजसवृत्तीच्या अभावी मानवी जीवनात मोठे दु:ख निर्माण होते. तेच शांताबाईनी नेमकेपणाने व्यक्त केले आहे.

**स्त्रियांचे भाषिक वेगळेपण**

शांताबाईचे वडील वारल्याने त्यांची सर्व भावंडे व आई चुलत्याकडे पुण्याला राहत. शाळेला सुट्टी लागली की सर्वजण आजोळी येत. आजोळचे दिवस फार सुखात जात. शाळेला सुट्टी कधी लागेल असे त्यांना होत असे. त्यांना आजोळची ओढ लागे. याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त करताना त्या लिहितात, ' दुधपित्या पोराला आईची जशी खंत येते, तशी मला आजोळची खंत येई. कधी एकदा सुट्टी लागते आणि मी आजोळी जाते, असे मला होऊन जाई. यावरुन शांताबाईच्या स्त्री सुलभ स्वभावाचे दर्शन घडते. आपल्या मनातील त्यावेळच्या भावना शांताबाईची अचूक शब्दांत टिपल्या आहेत.

अनेक स्त्रिया स्वत:चे वेगळेपण दाखविण्यासाठी धडपडत असतात. त्यातूनच अहंकाराचा जन्म होतो. शांताबाईच्या परिचयाच्या एक बाई होत्या. आपली अभिरुची उच्च दर्जाची आहे. अशी त्यांना खात्री होती. त्यामुळे त्यांना दुसऱ्यांचे काहीच पसंती पडत नसे. त्या म्हणतात, 'अगदी माझ्या नवऱ्याने केलेली खरेदीसुध्दा मला आवडत नाही. मला अगदी संगळ कसं नीटनेटकं, सुंदर, निवडक लागतं. माझ्या सारखी पसंती कुणाचीच नाही!' म्हणजे स्वत:ला इतरांपेक्षा वेगळे, विशेष समजण्याची वृत्ती अगदी सामान्य गोष्टींमधूनही प्रकट होत असते. माणसे स्वत:वर प्रतिमा लादत नाहीत तर ती मोठ्या आवडीने काळजीपूर्वक जोपासताना दिसतात. हेच शांताबाईंनी दाखवून दिले आहे.

ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथातील भाषेविषयी शांताबाई लिहितात, 'मराठी भाषा वयात येत असताना तिच्या अंगी नवतारुण्याचे जे तेज, सौंदर्य आणि नव्हाळी उत्पन्न झाली ती सारी ज्ञानेश्वरीमध्ये आपल्या प्रत्ययाला येते. ज्ञानेश्वरी या ग्रंथातील मराठी भाषेचे स्वरुप कसे आहे. याचे सौदर्यपूर्ण भाषेत वर्णन शांताबाईनी केले आहे. मराठी भाषेतील सामर्थ्य, सौंदर्य, नावीन्य त्यांनी अचूकपणे व्यक्त केले.

शांताबाईच्या परिचयाच्या एक प्रौढ, संसारी गृहिणी होत्या. त्या सतत इतरांशी अपुलकीने, आगत्याने, आदरातिथ्याने वागत त्यांच्या बोलण्यातून आध्यात्मिकतेचा भाव कसा उमटत असे हे व्यक्त करताना शांताबाई लिहितात, 'काल मेले, चार दिवसांचे तर आयुष्य. शेवट बरोबर काय यायचे आहे? दोन गोड शब्द दुसऱ्याशी बोलले, दुसऱ्यांना जरा जिव्हाळा दिला, तर तेवढंच संगतीला येईल, बाकी घरदार, चीजवस्त, धनदौलत इथच टाकून जायचे असतं ना?' म्हणजेच काही काही स्त्रियांना जीवनाचे क्षणभंगूरत्व जाणवलेले असते. जीवनातील समाधान, सुख, आनंद त्यांना गवसलेला असतो. त्यामुळे त्या आपल्या वाट्याला आलेले जीवन समाधानाचे, आनंदाने, सेवावृत्तीने मजेत जगतात. एकंदर यातून स्त्रियांचे वेगळे अनुभवविश्व प्रकट होते. स्त्री म्हणून काही बाबतीत तिला वेगळे जीवन जगावे लागते. तिचे बालपण, तरुणपण, वैवाहिक जीवन, सासर, मुलेबाळे कौटुंबिक समस्या, तिचा त्याग सोशिकता, संवेदनशीलता इत्यादी बाबतीत स्त्री म्हणून असलेला वेगळेपणा, तिचे वेगळे अनुभवविश्व प्रस्तुत लेखिकांनी नेमकेपणाने रेखाटले आहेत.

**समारोप :**

शांता शेळके यांच्या ललितगद्य लेखनातून स्त्री म्हणून कोणता वेगळेपणा जाणवतो याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. स्त्रियांचे स्वभावविशेष, स्त्रियांच्या वाट्याला आलेले वेगळे जीवन, त्यांचे वेगळे अनुभवविश्व, यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांची संवेदनशीलता, भावनाशीलता, हळुवारपणा, वत्सलता, प्रेमळपणा यांसारख्या स्त्रीस्वभाव विशेषांचे या लेखानातून दर्शन घडते. स्त्री जशी मनापासून प्रेम करते तसेच ती तीव्र द्वेषही करते. उदा. सावत्र, सासू - सून, जावा - जावा, नणंद - भावजय यासारख्या नात्यातून याचे दर्शन घडते. काही स्त्रिया कष्टाळू, त्यागी, खंबीर, हिंमतवान, स्वाभिमानी, परोपकारी असतात. बिकट परिस्थितीता खंबीरपणे तोंड देऊन त्या आपले आणि कुटूंबाचे जीवन सावरतात आणि स्वाभिमानाने, सन्मानाने जागतात. त्यामुळे त्यांना कुटूंबात, समाजात मानाचे स्थान मिळते. स्त्रीला आपल्या घराची, संसाराची, कुटूंबाची ओढ असते. घरगुती कामात तिला रस असतो. स्त्रियांच्या व्यक्तिमत्वातील अशा विविध पैलूंचे दर्शन प्रस्तुत लेखिकेच्या

लेखनातून घडते. स्त्रियांच्या प्रश्नांवर जेवढा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे तेवढा झालेला नाही. आजच्या प्रगत जीवनामध्ये स्त्रीकडे केवळ माणूस म्हणून पाहिले जात नाही. पुरुषप्रधान संस्कृती अप्रत्यक्षरित्या आपले वर्चस्व गाजवताना दिसते. स्त्रीकडे पाहण्याचा –ष्टिकोन परिवर्तन होणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजाच्या मानसिकतेत बदल झाला पाहिजे. स्त्रियांचे वेगळे अनुभवविश्व, भाषिक वेगळेपण आणि संवेदनशीलता, भावनाशीलता अशा स्त्री म्हणून असलेल्या वेगळ्याा विशेषांचा वेध या लेखातून घेतला आहे.

**संदर्भ टिपा :**

१. शांता शेळके, 'मनातले घर', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, २००० पृ. कृ. १०
२. तत्रैव, पृ. क्र ४२
३. तत्रैव, पृ. क्र १३१
४. शेळके शांता, अ - लौकिक, जे. के. प्रकाशन, नाशिक, प्रा. आ. १९९३ पृ. क्र. २०
५. शेळके शांता, 'जाणता अजाणता', परचुरे प्रकाशन, मुंबई, १९९५, पृ. क्र. ४९
६. शेळके शांता, 'धूळपाटी', सुरेश प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. क्र १२७
७. शेळके शांता, 'आनंदाचे झाड', मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे, १९८२ पृ. क्र. ६८
८. शेळके शांता, 'इतस्तत:', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९९८, पृ. क्र. ५०-५१
९. शेळके शांता, 'काही जवळ... काही दूर' नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, २००२, पृ. क्र. २५
१०.शेळके शांता, 'वडिलधारी माणसं', सुरेश एजन्सी, पुणे, १९८९, पृ. क्र. १०
११.शेळके शांता, 'मनातले घर', उनि. पृ. क्र. ७०
१२.शेळके शांता, 'रंगरेषा', मेहता पब्लिकेशन, १९९९, पृ. क्र. ४४
१३.शेळके शांता, 'मदरंगी', विमल प्रकाशन, १९८९, पृ. क्र. १२६
१४.शेळके शांता 'पाऊसाआधीचा पाऊस', सुरेश एजन्सी, १९८५, पृ. क्र. १२६
१५.शेळके शांता, 'जाणता - अजाणता', उनि पृ. क्र. १०८
१६.शेळके शांता, 'रंगरेषा', उनि. पृ. क्र. १२
१७.शेळके शांता, 'इतस्तत:', उनि. पृ. क्र. ११
१८.शेळके शांता, 'सांगावेसे वाटते म्हणून', ज्ञानदा पब्लिकेशन, पुणे, १९९८, पृ. क्र. ९१